सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

**क्रमांक : ७८९(११) /७०५/पंधरा-अ** **दिनांक ३० जुलै,२०२१**

## -:प्रसिद्धीपत्रक:-

**विषय:-** मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी, मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण अधिकारी , अभिरक्षक, प्रशिक्षण व विस्तार अधिकारी,(तांत्रिक), महाराष्ट्र मत्स्यसेवा, गट-ब पदसंख्या व आरक्षणातील बदलाबाबत.

**संदर्भ:-** जाहिरात क्रमांक-०४/२०२०

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी, मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण अधिकारी , अभिरक्षक, प्रशिक्षण व विस्तार अधिकारी,(तांत्रिक), महाराष्ट्र मत्स्यसेवा, गट-ब (जाहिरात क्र. ४/२०२०) संवर्गातील २७ पदावरील भरतीकरिता दिनांक ३१ जानेवारी,२०२० रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे.

**२.** सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाच्या आरक्षणाच्या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल सिव्हिल अपील क्रमांक ३१२३/२०२० या प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ५ मे, २०२१ रोजी दिलेल्या अंतिम आदेशानुसार सदर प्रवर्गाचे आरक्षण रद्दबातल ठरविण्यात आल्यामुळे शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी २०२०/प्र. क्र.३२०/१६-ब, दिनांक ५ जुलै, २०२१ अन्वये भरती प्रक्रिया राबविण्यासंदर्भात शासनाकडून सविस्तर मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाकरिता आरक्षित असणारी पदे अराखीव पदांमध्ये रूपांतरित करून भरतीप्रक्रीया राबविणे क्रमप्राप्त ठरते.

**३.** प्रस्तुत दिनांक ५ जुलै, २०२१ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीच्या आधारे सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाकरिता आरक्षित पदे अराखीव पदांमध्ये रूपांतरित केल्यानंतर विषयांकित परीक्षेतून भरावयाच्या एकूण २७ पदांचा सुधारित तपशील खालीलप्रमाणे आहेः-

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | आ.दु.घ. | एकूण आरक्षित पदे | अराखीव पदे | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ४ | २ | १ | १ | १ | - | - | ४ | ३ | १६ | ११ | २७ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक /समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ३ | १ | १ | १ | १ | - | - | ३ | २ | १२ | ७ | १९ |
| महिला | १* | १* | - | - | - | - | - | १* | १* | ४* | ३* | ७* |
| खेळाडू | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| अनाथ | - | - | - | - | - | - | - | - | - | - | १# | १# |
| दिव्यांग | एकूण २७ जागांपैकी ०१ जागा अंध / अल्पदृष्टी (Blindness / Low vision)या दिव्यांग प्रवर्गासाठी आरक्षित आहे. | | | | | | | | | | | |

**४.** वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**५.** उपरोक्त पदसंख्येच्या आधारे मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी, मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण अधिकारी , अभिरक्षक, प्रशिक्षण व विस्तार अधिकारी,(तांत्रिक), महाराष्ट्र मत्स्यसेवा, गट-ब करीता भरती प्रक्रिया राबविण्यात येईल.

**उप सचिव,सरळसेवा-२**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई**